मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# ‘रेड झोनमुक्त पिंपरी-चिंचवड’साठी पाठपुरावा करणार!

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन : आमदार महेश लांडगे यांच्या आग्रही मागणीला प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील ‘रेड झोन’चा प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही प्रयत्न केले. अनेकदा बैठक झाली. तत्कालीन संरक्षण मंत्री मनोहर पर्रिकर यांनीही सकारात्मक भूमिका घेतली होती. पण, हा प्रश्न सोडवण्यासाठी पुन्हा प्रयत्न करणे गरजेचे आहे. देशात नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान होतील आणि शिरुरमधून शिवाजीराव आढळराव पाटील हे खासदार होतील. त्यामुळे ‘रेड झोनमुक्त पिंपरी-चिंचवड’ करण्यासाठी आम्ही पुन्हा संरक्षण विभाग आणि प्रधानमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार आहोत आणि हा प्रश्न सोडवणार आहोत, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



शिरुर लोकसभा मतदार संघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारानिमित्त भोसरी येथील गावजत्रा मैदानावर जाहीर सभा आयोजित करण्यात आली. यावेळी फडणवीस बोलत होते.

आमदार महेश लांडगे यांनी आपल्या भाषणात ‘रेड झोन’ बाबत उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे लक्ष वेधले. फडणवीस यांच्या सहकार्यामुळे शहरातील शास्तीकर, उपयोगकर्ता शुक्ल, कचरा प्रक्रिया प्रकल्प, स्वतंत्र पोलीस आयुक्तालय, समाविष्ट गावांचा विकास, आंद्रा, भामा आसखेड पाणी प्रकल्प आदी ‘भोसरी व्हीजन-२०20’मधील सर्व महत्वपूर्ण विषय मार्गी लागले. मोदी सरकार धाडसी निर्णय घेण्यासाठी ओळखले जाते. हा प्रश्न तुम्हीच सोडवू शकता त्यामुळे पिंपरी-चिंचवडकरांची ‘रेड झोन’ची मुक्तता करावी, असे आवाहन आमदार लांडगे यांनी केले.

दरम्यान, २०१४ मध्ये राज्यात भाजपा प्रणित सरकार स्थापन झाल्यापासून भोसरीतील ऐतिहासिक गावजत्रा मैदानावर देवेंद्र फडणवीस यांनी ज्या-ज्या वेळी जाहीर सभा केल्या. आमदार लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडकरांचे प्रश्न आणि मागण्या त्यांच्यासमोर ठेवल्या. त्या सभांमध्ये दिलेल्या सर्व आश्वासनांची त्यांनी पूर्तता केलेली आहे. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा याच मैदानावर फडणवीस यांनी ‘रेडझोन’बाबत पिंपरी-चिंचवडकरांना आश्वासित केले आहे. त्यामुळे रेडझोनमधील मिळकतधारक, उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिक अशा २ लाख पिंपरी-चिंचवडकरांच्या आशा आता पल्लवीत झाल्या आहेत.

> “ पिंपरी-चिंचवड शहरातील सुमारे २ लाख मिळकतधारक, लघु व मध्यम उद्योजक यांना दिलासा देण्यासाठी ‘रेड झोन’ हद्द कमी करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. आमदार महेश लांडगे यांनी ‘रेड झोन मुक्त पिंपरी-चिंचवड’ची मागणी केली. त्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेण्याचे आश्वासन दिले आहे. ‘रेड झोन’चा तिढा सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. त्यासाठी संरक्षण विभाग आणि मोदी सरकार निश्चितपणे सकारात्मक भूमिका घेणार आहे.
>
> **- शिवाजीराव आढळराव पाटील. महायुती उमेदवार.**

# मतदारांना मतदानासाठी ओळखपत्र अनिवार्य

## 100 मीटर परिसरात मोबाईल नेण्यास प्रतिबंध : नियमाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर नियमाधीन कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या मतदानासाठी येणाऱ्या मतदारांकडे ओळख मतदान चिट्टी (फोटो वोटर स्लीप) असणे अनिविवार्य आहे. मतदाराकडे भारत निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या पुराव्यांपैकी किमान एका पुराव्याची मूळ प्रत असणे आवश्यक आहे. डिजिटल लॉकर मधील सॉफ्ट कॉपी ओळखीचा पुरावा म्हणून ग्राह्य धरली जाणार नाही, अशी स्पष्ट सूचना मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांनी दिली. तसेच मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मोबाईल नेण्यास प्रतिबंध असून कोणीही मतदान केंद्राच्या १०० मीटर क्षेत्रात सोबत मोबाईल आणू नये असे आवाहन त्यांनी केले आहे. नियमाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर नियमाधीन कारवाई करण्यात येईल, असेही ते म्हणाले.



मावळ लोकसभा मतदार संघासाठी येत्या सोमवारी दि.१३ मे रोजी प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्यानुषंगाने आकुर्डी येथील मावळ लोकसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात पत्रकार परिषेदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पुणे ग्रामीणचे उपविभागीय पोलीस उप अधीक्षक सत्य साई कार्तिक, मावळ लोकसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाचे निवडणूक समन्वय अधिकारी प्रवीण ठाकरे, हिंमत कराडे, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे सहायक पोलीस आयुक्त सतीश माने, निवडणूक समन्वयक अभिजित जगताप, निवडणूक सहाय्यक सचिन मस्के, माध्यम समन्वय अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह पत्रकार उपस्थित होते.

मतदारांनी मतदान करण्यासाठी येताना ओळख मतदान चिट्टी सोबत भारत निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या १२ ओळख पत्रांपैकी कोणत्याही एका ओळखपत्राची मूळ प्रत सोबत ठेवणे अनिवार्य असून मतदारांना केवळ ओळख मतदान चिट्टीद्वारे मतदान करता येणार नाही. तसेच डिजिटल लॉकर मधील सॉफ्ट कॉपी अथवा ओळखीच्या पुराव्याची छायांकित प्रत मतदानासाठी पुरावा म्हणून ग्राह्य धरली जाणार नसल्याची माहिती देखील त्यांनी दिली. तसेच भारत निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या अधिकाऱ्यांशिवाय इतर कोणालाही मतदार केंद्रावर मोबाईल नेण्यास प्रतिबंध करण्यात आले आहे.

# इंग्रजांना घालवले तर मोदी काय चीज

## केंद्र सरकारकडून सत्तेचा गैरवापर सुरु : शरद पवारांचा पंतप्रधान नरेंद्र मोदींवर हल्लाबोल



**पुणे | प्रतिनिधी**

केंद्र सरकारकडून सत्तेचा गैरवापर सुरु आहे. विरोधात बोलणाऱ्यांना खोट्या केस टाकून तुरुंगात टाकले जाते. देश हुकूमशाहीच्या रस्त्याने चालला आहे. या देशात ज्यांच्या साम्राज्यात सूर्य मावळत नाही असे म्हणणाऱ्या इंग्रजांना महात्मा गांधी घालवू शकले. तर, पंतप्रधान नरेंद्र मोदी काय चीज आहेत, असा सवाल करत त्यांनाही सत्तेतून घालवू, असा विश्वास ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केला.

शिरुरचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे यांच्या प्रचारासाठी शरद पवार यांची सांगता सभा हडपसर येथे झाली. त्यावेळी ते बोलत होते. माजी आमदार महादेव बाबर, बाळासाहेब शिवरकर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, अंकुश काकडे, निलेश मगर यावेळी उपस्थित होते.

भाजपला टीका, वेगळे मत सहन होत नाही. मनाविरोधात बोलले की खोट्या केस टाकून तुरुंगात टाकत असल्याचा आरोप करत पवार म्हणाले की, दहा वर्षांत काय केले हे सांगण्यापेक्षा मोदी व्यक्तीगत हल्ले करत आहेत. असत्यावर आधारित बोलत आहेत. काँग्रेसच्या जाहिरनाम्यात उल्लेख नाही, अशा गोष्टी मांडतात. भगिनींच्या गळ्यातील मंगळसूत्र काढून घेतील असे सांगतात. सांगण्यासारखे काही नसल्याने असत्य प्रचार करत आहेत. राहुल गांधी यांची टिंगलटवाळी करतात. गांधी कुटुंबाने देशासाठी योगदान दिले असून त्याच्या एक टक्का तरी मोदी यांनी योगदान दिले का, याचे उत्तर द्यावे. देशात गांधी-नेहरु यांचा विचार मजबूत केला पाहिजे असे विधान मी केले. त्यावर आमच्या पक्षात या म्हणत आहेत. ज्या पक्षात व्यक्तीगत स्वातंत्र्य नाही, देशाच्या ऐक्याच्या विचार नाही. विचारधारेत समाजातील सर्व घटकांना आत्मविश्वास देण्याचा कार्यक्रम नाही. धर्मवादी विचाराचा पुरस्कार केला जातो, अशा पक्षाच्या आसपाससुद्धा मी, उद्धव ठाकरे आयुष्यात कधी उभे राहणार नाही. या लोकांना सत्तेतून बाहेर काढण्यासाठी जे काही करता येईल, ते केले जाईल.

देशातील निवडणुका एक, दोन ते जास्तीत-जास्त तीन दिवसात झाल्या. यंदा पहिल्यांदा सात टप्प्यांत निवडणूक होत असून निवडणूक विभागाचा निर्णय संशय निर्माण करणारा आहे. ४० खासदार असलेल्या तामिळनाडूतील निवडणूक एका टप्प्यात आणि महाराष्ट्रातील ४८ खासदारांची निवडणूक सहा टप्प्यांत, हे कशासाठी, याचा अर्थ काय, लोकांच्या मनात निवडणूक प्रक्रियेबाबत शंका आहे. त्याला पुष्टी देण्याचे काम या निर्णयामुळे होत असल्याचेही ते म्हणाले.

### सत्तेच्या मलिद्यासाठी चेतन तुपे यांचा वेगळा निर्णय

देशाच्या, राज्याच्या ऐक्यासाठी दिवंगत विठ्ठलराव तुपे हे नेहमी संघर्ष करायची तयारी करणारे होते. ते नेहमी जनसंघ, भाजपच्या विचारापासून दूर राहिले. त्यांची परंपरा दुसऱ्या पिढीने चालवावी, अशी अपेक्षा होती. दुर्दैवाने त्यांची आताची पिढी आमदार चेतन तुपे हे आमच्या पाठिंब्याने विजयी झाले. परंतु, सत्तेचा मलिदा मिळेल या हेतूने भाजपसोबत गेले. याचा निर्णय योग्य वेळी घेतला जाईल, असा इशाराही पवार यांनी दिला.

### जनतेचा प्रतिसाद मिळत नसल्याने महाराष्ट्रात सभा

» देशाच्या पंतप्रधानांनी एका राज्यात किती वेळा प्रचारासाठी जावे. पंडित जवाहरलाल नेहरु, इंदिरा गांधी यांची राज्यात एक सभा होत होती. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी एका राज्यात आठ सभा घेतात. तो त्यांचा अधिकार आहे. पण, आजपर्यंत हे कधी घडले नाही. आताच का घडत आहे. एवढ्या सभा घेऊनसुद्धा हवा तो परिणाम दिसत नाही. त्यामुळे ते सातत्याने सभा घेतात. शासनाचा जमाव घेऊन जात त्या माध्यमातून निवडणुकीचे निकाल वेगळे लागतील का याची खबरदारी घेणे हे सूत्र मोदी यांचे आहे, असे दिसते. त्याचे उत्तर त्यांना द्यावे लागेल, असेही पवार म्हणाले.

# निवडणुकीमुळे वाहन विक्रीला फटका!

## पुण्यात यंदा 6 हजार 564 वाहनांची खरेदी : गेल्या वर्षीच्या तुलनेत वाहन विक्रीत सुमारे 25 टक्क्यांची घट



**पुणे | प्रतिनिधी**

साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी एक असलेल्या अक्षय तृतीयेनिमित्त यंदा नागरिकांचा वाहन खरेदीकडे कमी कल दिसून आला. पुण्यात यंदा ६ हजार ५६४ वाहनांची खरेदी झाली असून त्यात दुचाकींचे प्रमाण सर्वाधिक आहे. मात्र, गेल्या वर्षीच्या तुलनेत वाहन विक्रीत सुमारे २५ टक्क्यांची घट झाली आहे. निवडणुकीमुळे वाहन विक्रीला फटका बसल्याचे वितरक आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे म्हणणे आहे.

यंदा अक्षय्य तृतीयेच्या आधीच्या नऊ दिवसांत ६ हजार ५९४ वाहनांची नोंदणी प्रादेशिक परिवहन कार्यालयात झाली. गेल्या वर्षी अक्षय्य तृतीयेच्या आधीच्या नऊ दिवसांत ८ हजार ६२० वाहन विक्री झाली होती. यंदा विक्रीत सुमारे २ हजारांनी घट झाली आहे. यंदाही विक्री झालेल्या वाहनांमध्ये दुचाकींचे प्रमाण सर्वाधिक असून, ४ हजार २७० दुचाकींची विक्री झाली. त्याखालोखाल १ हजार ३७१ मोटारींची विक्री झाली. तसेच, मालवाहतूक वाहने २०५, रिक्षा १४२, बस १९, टॅक्सी १२७ आणि इतर वाहने ७० अशी विक्री झाली. गेल्या वर्षीच्या तुलनेत मालवाहतूक वाहने, रिक्षा, बस, टॅक्सी यांची विक्री निम्म्याने घटली आहे.

इलेक्ट्रिक वाहनांच्या विचार करता गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा विक्री निम्म्याने कमी झाली आहे. अक्षय्य तृतीयेच्या आधीच्या नऊ दिवसांत ३९० ई-वाहनांची विक्री झाली. ई-वाहनांध्ये सर्वाधिक ३५८ दुचाकींची विक्री झाली. त्याखालोखाल ३१ ई-मोटारींची विक्री झाली. गेल्या वर्षीच्या तुलनेत ई-दुचाकींची विक्री निम्म्याने कमी झाली आहे. तसेच इतर ई-वाहनांमध्ये केवळ एका रिक्षाची विक्री झाली असून, मालवाहतूक वाहने, बस, टॅक्सी आणि इतर वाहनांची विक्री झालेली नाही.

निवडणुकीचा कालावधी असल्याने वाहन विक्रीवर परिणाम झाला असण्याची शक्यता आहे. निवडणुकीमुळे अनेक जण बाहेरगावी जात असल्याने त्यांच्याकडून वाहन खरेदी लांबणीवर टाकली जाते. त्यामुळे विक्री कमी झालेली दिसते, असे प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर यांनी सांगितले.

गेल्या वर्षीपेक्षा यंदा अक्षय्य तृतीयेला वाहनांना मागणी कमी दिसून आली. स्थलांतरित वर्ग मोठ्या प्रमाणात पुण्यात असून, तो निवडणुकीमुळे मूळ गावी गेला आहे. त्यांच्याकडून खरेदी कमी झाल्याने यंदा विक्री कमी झाल्याचे दिसून येत आहे अशी माहिती कोठारी व्हील्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी रूपेश कोठारी यांनी दिली.

# संजोग वाघेरेंच्या पदयात्रेला तुफान प्रतिसाद

## व्यापारी, व्यावसायिकांसह मतदारांशी साधला संवाद : फटाक्यांची आतषबाजी, फुलांचा वर्षाव करत स्वागत

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी पिंपरी परिसरात पदयात्रा काढून प्रचार केला. या पदयात्रेत “संजोग वाघेरे पाटील आगे बडो, हम तुमारे साथ है”...”एकच ध्यास, “मावळ लोकसभेचा विकास”, अशा घोषणा देत असंख्य पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी पदयात्रेत मतदरांना संजोग वाघेरे यांना विजयी करण्याचे आवाहन केले.

संजोग वाघेरे यांच्या पदयात्रेस पिंपरीगावातून प्रारंभ झाला. पुढे पिंपरी बाजारपेठेत गुरुद्वारा, साई चौक, शगुन चौक, अशोक चौक, रिव्हर रोड, डीलक्स चौकासह परिसरातील व्यापारी व मतदार बंधू-भगिनींना अभिवादन करत संजोग वाघेरे पाटील यांनी मशाल चिन्हासमोरील बटण दाबून विजयी करण्याचे आवाहन केले. ठिकठिकाणी त्यांचे फटाक्यांची आतषबाजी, फुलांचा वर्षाव करत स्वागत करण्यात आले. त्यांच्यासमवेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार ॲड गौतम चाबुकस्वार, शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले, उपजिल्हाप्रमुख रोमी संधू, मावळ लोकसभेचे प्रचारप्रमुख योगेश बाबर यांच्यासह असंख्य कार्यकर्ते, युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी व्यापारी, व्यावसायिकांनी संजोग वाघेरे पाटील यांचे आपुलकीने ठिकठिकाणी स्वागत केले. पदयात्रेत “संजोग वाघेरे पाटील आगे बडो, हम तुमारे साथ है”...”एकच ध्यास, “मावळ लोकसभेचा विकास”, “येऊन येऊन येणार कोण?, संजोग वाघेरेंशिवाय दुसरं आहेच कोण?’ अशा घोषणांनी पिंपरीतील परिसर कार्यकर्त्यांनी दणाणून सोडला. या भागात पदयात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### सरकारच्या धोरणांवर व्यापारी नाराज – संजोग वाघेरे

» व्यापारी वर्गासोबत संवाद साधताना संजोग वाघेरे पाटील म्हणाले की, गेल्या दहा वर्षात केंद्रातील सरकारमुळे सर्वसामान्य वर्ग बेजार झालेला आहे. परंतु, नोटबंदी, जीएसटी आणि जाचक कायद्यामुळे व्यापारी, व्यावसायिक वर्गाला मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागलेला आहे. तर दुसरीकडे मावळ लोकसभेतील अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. मतदारसंघात पिंपरीसह अनेक ठिकाणी लहान-मोठ्या बाजारपेठा आहेत. व्यापारी वर्गाला उद्भभणा-या अडचणी आणि त्यांचे प्रश्न मांडण्याकडे आताच्या खासदारांनी दुर्लक्ष केले. व्यापारी वर्गाचे प्रश्न मांडून त्याला वाचा फोडण्याचे काम करू, असे आश्वासन या निमित्ताने वाघेरे यांनी व्यापारी वर्गाला दिले. तसेच, येत्या 13 तारखेला मशाल चिन्ह लक्षात ठेवून उद्धव ठाकरे साहेबांची स्वाभीमानी शिवसेना आणि महाविकास आघाडीला विजयी करा, अशी साद त्यांनी घातली.

# पीडीसीसी बँकेच्या वेल्हा शाखेच्या व्यवस्थापकाचं निलंबन

## निवडणूक आयोगाच्या आदेशावरुन विनायक ज्ञानोबा तेलवडे यांच्यावर गुन्हा दाखल

**पिंपरी | प्रतिनिधी**

बारामती लोकसभा मतदारसंघात मतदानाच्या आदल्या रात्री पहाटेपर्यंत बँक उघडी ठेवणारे पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वेल्हा शाखेचे मॅनेजर तलवडे यांना निलंबित करण्यात आले आहे. निवडणूक आयोगाच्या आदेशावरून विनायक ज्ञानोबा तेलवडे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता.

बारामती लोकसभा मतदारसंघासाठी 7 मे रोजी मतदान झाले. त्याच्या आदल्या रात्री वेल्हे तालुक्यातील जिल्हा बँकेची शाखा पहाटेपर्यंत सुरु असल्याचा व्हिडिओ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून निवडणूक आयोगाला सादर करण्यात आला होता. आमदार रोहित पवारांनी बँकांतून मतदारांना पैसे वाटले जात असल्याचा आरोप केला होता. त्यानं तर निवडणूक आयोगाकडून कारवाई करण्यात आली.




**बारामती मतदानाच्या दिवशी पवार कुटुंबात जोरदार वाकयुद्ध**

बारामती मतदानाच्या दिवशी पवार कुटुंबात जोरदार वाकयुद्ध झालं. आत्तापर्यंत कधीच न अनुभवलेली अजित पवार आणि रोहित पवारांची आक्रमकता बारामतीकरांनी मतदानाच्या दिवशी अनुभवली. रोहित पवारांनी एक ट्वीट करत याची सुरुवात केली. भोरमध्ये अजित पवारांचे कार्यकर्ते पैसा वाटत असल्याचा दावा करत रोहित पवारांनी एक व्हिडीओ ट्विट केला. पैसे वाटणारे लोक अजित दादा मित्रमंडळाचे कार्यकर्ते असल्याचा दावा रोहित पवारांनी केलाय. या आरोपानंतर काही वेळासाठी तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. ज्या वाहनातून पैसे वाटल्याचा आरोप केला जात आहे त्या वाहनाच्या काचा देखील फोडण्यात आल्या आहेत. संशयीत वाहनामध्ये घड्याळ चिन्हाचे प्रचार करणारे काही साहित्य देखील आढळले. तर दुसऱ्या व्हिडिओत वेल्हे गावातली पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक रात्रीच्या सुमारास सुरु असलेली दिसत होती. बँक रात्री 1 वाजताही का सुरु ठेवली असा सवाल रोहित पवारांनी विचारला. बँकेतून पैसे वाटप केल्याचा आरोपही त्यांनी अजित पवारांवर केला होता. पैसेवाटप, दमदाटीचा आरोप आणि वैयक्तिक हेव्यादाव्यांमुळं आज बारामतीत मतदानाचा दिवस गाजला.

### काय आहे प्रकरण?


» पीडीसीसी बँक बारामतीच्या मतदानाच्या आदल्या मध्यरात्रीपर्यंत चालू होती, अशी तक्रार राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडून करण्यात आली होती. त्या तक्रारीला निवडणूक आयोगाने गांभीर्याने घेतले आणि व्यवस्थापकाचे निलंबन केले. निवडणूक आयोगाकडून त्यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा बँकेच्या मॅनेजरने सहकार्य केलं नाही. सीसीटीव्ही फुटेज मिळालं. त्या फुटेजमध्ये 40 ते 50 लोक त्या ब्रँचमध्ये, डायरेक्टरच्या ऑफिसमध्ये आत बाहेर आत बाहेर करत होते. यावर निवडणूक आयोगाने कारवाई केली आहे. कारवाई केली.

# पुण्याला आता नवीन पुण्याची गरज

## अजित पवार यांचा डॉ. कोल्हेंवर निशाणा : लोणीतील सभेत पाणीप्रश्न सोडविण्याचे आश्वासन

**पुणे | प्रतिनिधी**

काँग्रेस इंडिया आघाडीकडे मुद्दे नसल्याने राज्य घटना बदलण्याचा संभ्रम निर्माण करत आहे. राज्यघटनेतील मूलभूत तत्त्व बदलता येत नाहीत. इंदिरा गांधी यांनीच घटनेची मोडतोड केली. ८० वेळा काँग्रेसनेच घटना दुरुस्ती केली. जे कामाने निवडून येत नाही, ते जातीची ढाल पुढे करतात, असे मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मांडले.



महाराष्ट्राला गेल्या पाच वर्षांत ५ लाख कोटी रुपये दिले. पुण्यामध्ये वाहतूक कोंडी, प्रदूषण असे प्रश्न आहेत. स्वारगेटसारखी गर्दी विमानतळावर होते. त्यामुळे नवी मुंबईच्या धर्तीवर पुण्याला आता नवीन पुण्याची गरज आहे, असेही त्यांनी सांगितले. पुणे लोकसभा मतदारसंघातील भाजपचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारार्थ नातूबाग मैदान येथे झालेल्या प्रचार सभेत गडकरी बोलत होते. अमोल प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दीपक मानकर, रुपाली पाटील ठोंबरे, किरण साळी, हेमंत रासने, स्वरदा बापट, श्रीनाथ भिमाले, शैलेश टिळक, ॲड. मंदार खरे या वेळी उपस्थित होते.

गडकरी म्हणाले, की गिरीश बापट आणि मुक्ता टिळक प्रचार सभेत नाहीत असे पहिल्यांदाच होत आहे. पुण्याची मेट्रो आणि विमानतळाचा प्रश्न सुटत नव्हता. संरक्षण विभागाकडून परवानगी घेऊन विमानतळाच्या जागेचा प्रश्न सुटला. तसेच मेट्रोच्या बाबतीतही झाले. या दोन्हीची कामे वेगाने झाली. पुणे ते छत्रपती संभाजीनगर दोन तासांत जाता येईल असा रस्ता करत आहोत. पुणे बेंगलोर मार्गाचे कामही सुरू होणार आहे. पुणे नाशिक, तळेगाव-चाकण-शिक्रापूर डबलडेकर उड्डाणपूल होणार आहे. किवळे तेनललेपूल नवा उन्नत मार्ग करण्यात येणार आहे. १२ हजार कोटी खर्च करून पालखी मार्ग केला आहे. त्याचे उद्घाटन निवडणुकीनंतर होणार आहे. काश्मीरला कन्याकुमारीशी रस्त्याने जोडण्याचे स्वप्न डिसेंबरपर्यंत पूर्ण होईल. मोदी सरकारने उद्योग, रोजगार निर्मितीसाठी पायाभूत सुविधांवर भर दिला आहे. त्यामुळे निर्यात तीन पट वाढली आहे. देश प्रगतीपथावर आहे. आयात कमी करून निर्यात वाढवली पाहिजे. इंडियन ऑईल इथेनॉलचे ३०० पंप सुरू करणार आहे. नदी काठसुधार प्रकल्पातून पुण्याचे सौंदर्यीकरण होणार आहे.

दरिद्री नारायणाला परमेश्वर मानून आम्ही कार्यरत आहे. २५ कोटी लोक दारिद्र्यरेषेतून बाहेर पडले, तर देशात गरिबी राहणार नाही. अल्पसंख्यांकांचे लांगूलचालन म्हणजे सेक्युलरिझम नाही. मी जे बोलतो, ते करतो, जे करतो, ते सांगतो. मी बोललो ते केले नाही दाखवणारा एकही माय का लाल पैदा झाला नाही, असे नितीन गडकरी यांनी सांगितले.

### खासदार नसतानाही मी जनतेसाठी काम केले

» पुणे वर्तुळाकार मार्गाचे काम आता होत आहे. माझी एक चूक झाली, ती म्हणजे मुंबई पुणे एक्स्प्रेस हायवेचे काम करताना २५ वर्षांचा विचार करून काम करायला हवे होते. पण आता वर्तुळाकार मार्गामुळे वाहतुकीची समस्या सुटणार आहे. महामार्गावरील वाहतूक शहरात येणार नाही, असेही नितीन गडकरी यांनी सांगितले.

# लोकसभा मतदानाच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलीस 'एक्शन मोड'वर

## शहरात गेल्या काही दिवसात गोळीबाराच्या घटना : गुन्हे शाखेकडून गुंडांची झाडाझडती

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे लोकसभा निवडणुकीतील मतदानाच्या पार्श्वभूमीवर गुन्हे शाखेने गुंडांची झाडाझडती घेण्यास सुरुवात केली आहे. गंभीर गुन्ह्यात जामीन मिळवून बाहेर पडलेले सराइत, तसेच त्यांच्या साथीदारांची चौकशी सुरू करण्यात आली आहे.




शहरात गेल्या काही दिवसात गोळीबाराच्या घटना घडल्या. टोळक्याने वाहनांची तोडफोड केल्याची घटना घडली. पुणे लोकसभा मतदारसंघातील मतदान सोमवारी (१३ मे) आहे. मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी गेल्या तीन दिवसांपासून पोलिसांनी गुंडांची झाडाझडती घेण्यास सुरुवात केली आहे. दररोज मध्यरात्री पोलिसांकडून तपासणी मोहीम (कोम्बिंग ऑपरेशन) राबवण्यात येत असून, गुंडांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे. कोंढवा, मुंढवा, हडपसर, बिबवेवाडी, मार्केट यार्ड, वानवडी, लोणी काळभोर परिसरातील सराइतांविरोधात कारवाईचा बडगा उगारण्यात येत आहे.

गुन्हेशाखेचे अपर पोलिस आयुक्त शैलेश बलकवडे, उपायुक्त अमोल झेंडे, सहायक आयुक्त सुनील तांबे, सतीश गोवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या पथकांकडून दररोज रात्री शहराच्या वेगवेगळ्या भागातील सराईतांची तपासणी सुरू करण्यात आली आहे. यावेळी सराईतांची माहिती त्वरित जवळचे पोलिस ठाणे अथवा पोलिस नियंत्रण कक्षास द्यावी, असे आवाहन देखील करण्यात आले आहे.

> निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी शहरातील वेगवेगळ्या भागात सराईतांची तपासणी करण्यात येत आहे. गंभीर गुन्ह्यातील आरोपींवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे. या मोहिमेत गुन्हे शाखेसह स्थानिक पोलिस ठाण्यांतील पथकांचा देखील सहभागी आहे.
>
> **- अमोल झेंडे, पोलिस उपायुक्त, गुन्हे शाखा.**